## अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना प्री मॅट्रिक शिष्यवृत्ती सन २०१०-११
## फार्म भरताना लक्षात घ्यावयाच्या सूचना

१) अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना ही योजना इ. १ ली ते १० वी च्या शासनमान्य शासकीय अनुदानित विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना लागू राहील.

२) केंद्रशासनाने जाहीर केल्याप्रमाणे अल्पसंख्यांक समाजामधे मुस्लीम, ख्रिश्चन शीख, बौध्द व पारशी या धर्माचा समावेश होतो

३) शिष्यवृत्ती साठीचा अर्ज मुख्याध्यापक./ केंद्र प्रमूख यांचे कडून घ्यावा. विहीत नमुन्यातील छापील अर्जच विद्यार्थ्यानी भरून दयावा. सदर अर्ज मुख्याध्यापक/केंद्र प्रमूख व गट शिक्षणाधिकारी यांचेकडे विनामुल्य मिळेल.

४) अर्जासोबत विद्यार्थ्यानी कोणत्याही प्रकारची कागदपत्रे जोडू नयेत आणि अर्जाला पीन/ टाचणी लावू नये.

५) विद्यार्थ्यांचे गेल्यावर्षाचे गुण,विद्यार्थी अल्पसंख्यांक असल्याबाबत आणि इतर माहिती बरोबर असल्याचे मुख्याध्यापकाने प्रमाणित करावे व अर्जाच्या पहिल्या व मागच्या पानावर स्वतःचा सही शिक्का दयावा.

६) शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी मागील वर्षाच्या परिक्षेमध्ये ५०टक्के पेक्षा जास्त गुण आवश्यक आहेत. तसेच विद्यार्थ्याच्या पालकांचे एकत्रित उत्पन्न रूपये एक लाखापेक्षा जास्त नसावे.

७) परिरक्षणं भत्ता वसतीगृहातील तसेच वसतीगृहाबाहेरील विद्यार्थ्यांना दिलेल्या दराप्रमाणे अनुज्ञेय आहे.

८) एका कुटुंबातील दोन पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अनुज्ञेय नाही.

९) विद्यार्थ्यांची नियमित उपस्थिती आवश्यक आहे.

१०) ही शिष्यवृत्ती घेणा-या विद्यार्थ्यांचे अपवादात्मक परिस्थितीशिवाय एका शाळेतून दूसया शाळेत स्थलांतर करता येणार नाही.

११) एखाद्या विद्यार्थ्यास चुकीच्या माहितीच्या आधारे शिष्यवृत्ती दिली गेल्याचे निदर्शनासआल्यास त्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती तात्काळ रद्द करण्यात येईल व त्यास प्रदान करण्यात आलेल्या शिष्यवृत्तीच्या रकमेची वसुली करण्यात येईल.

१२) ज्या विद्यार्थ्यांना या शिष्यवृतीचा लाभ देण्यात आला आहे अशा विद्यार्थ्यांना इतर योजनांतून मिळण्याया शिष्यवृत्ती व सवलतीचा लाभ घेता येणार नाही.

१३) अपुर्ण भरलेले, स्वतःची सही केलेला फोटो नसलेले, विद्यार्थ्याची/पालकांची/मुख्याध्यापकाची सही नसलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

१४) शिष्यवृत्ती मंजूर झाल्या नंतर विद्यार्थ्यांची पुढील कागद पत्रे मुख्याध्यापकाने जमा करावी
अ) बँकेत खाते उघडून बँकेच्या खाते पुस्तकाच्या पहिल्या पानाची झेरॉक्स.
ब) स्वंयंरोजगार असलेल्या पालकांनी रू. १०/-च्या नॉन ज्युडिशिअल स्टॅम्पवर स्वः साक्षाकींत उत्पनाचा दाखला दयावा आणि नोकरी करणा-या पालकांनी उत्पन्नाचे प्रमाणपत्र दयावे.
क) शिष्यवृत्ती मंजूर झाल्यानंतर अल्पसंख्यांक असल्याबाबतचे प्रमाणपत्र रू.१०/- च्या नॉन ज्युडिशिअल स्टॅम्प पेपरवर देणे आवश्यक राहील.

१५) नुतनी करणासाठी सदरचा अर्ज वापरू नये नुतनीकरणासाठी मुख्याध्यापकांकडे देण्यात आलेल्या तक्त्यात माहिती दयावी.

१६) अ.क्र.१ शाळेचा क्रमांक- शाळेचा क्रमांक परिक्षा परिषेदेच्या माध्यमिक व पुर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परिक्षेप्रमाणे देण्यात आला आहे.

| ६ | २ | | ० | २ | | ३ | १ | ५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जिल्हा क्रमांक | | | तालुका क्रमांक, | | | शाळा क्रमांक | | |

पूर्वीच्या अल्पसंख्यांक मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती परिक्षेमध्ये देण्यात आलेल्या शाळा क्रमांकाची सूची तालुकावार देण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे शाळा क्रमांक आवेदनपत्रामध्ये देण्यात यावेत. याव्यतिरिक्त ज्या शाळेचे क्रमांक तालुका यादीमध्ये नाहीत त्यांना शेवटच्या तालुकाप्रमाणे शळा क्रमांक देण्यात यावेत. व त्यांची यादी आवेदन पत्र सादर करताना स्वतंत्रपणे देण्यात यावी.

१७) जिल्हा क्रमांक व जिल्हयाचे नावः-
जिल्हा क्रमांकाची यादी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषेदेच्या यादी प्रमाणेच आहे. माहीतीसाठी यादी सोबत जोडली आहे.जिल्हयाच्या नावापुढे संबधित जिल्हयाचे नाव लिहिणे जिल्हयाच्या नावाखाली शाळेचा आवेदन पत्र क्रमांक व त्याखाली शाळेच्या एकूण आवेदन पत्राची संख्या लिहावी.

| जिल्हयाचा संकेतांक | जिल्हयाचे नाव | जिल्हयाचा संकेतांक | जिल्हयाचे नाव | जिल्हयाचा संकेतांक | जिल्हयाचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| ११ | मुंबई (दक्षिण) | ४१ | कोल्हापूर | ६३ | अकोला |
| १२ | मुंबई (पश्चिम) | ४२ | सातारा | ६४ | वाशिम |
| १३ | मुंबई (उत्तर) | ४३ | सांगली | ६५ | यवतमाळ |
| १४ | रायगड | ४४ | रत्नागिरी | ७१ | नागपुर |
| १५ | ठाणे | ४५ | सिंधुदुर्ग | ७२ | भंडारा |
| २१ | पुणे | ५१ | औरंगाबाद | ७३ | गोंदिया |
| २२ | अहमदनगर | ५२ | जालना | ७४ | वर्धा |
| २३ | सोलापूर | ५३ | बीड | ७५ | चंद्रपूर |
| ३१ | नाशिक | ५४ | परभणी | ७६ | गडचिरोली |
| ३२ | धुळे | ५५ | हिंगोली | ८१ | लातूर |
| ३३ | जळगांव | ६१ | अमरावती | ८२ | उस्मानाबाद |
| ३४ | नंदुरबार | ६२ | बुलढाणा | ८३ | नांदेड |

आवेदन पत्र हे स्कॅनिंग होणार असल्यामुळे त्यास घडया करू नये अथवा दूमडू नये. शाळाप्रमाणे आवेदनपत्रावर अनुक्रमांक टाकावेत व त्याखालील रकाण्यात शाळेच्याएकूणआवेदनपत्राची संख्या लिहावी आवेदन पत्र हे प्रत्येक शाळेप्रमाणे स्वतंत्र दयावेत. सर्व शाळांचे आवेदन पत्र एकत्रीत करू नयेत. शाळेचे आवेदन पत्राचा स्वतंत्र तक्ता जिल्हयाप्रमाणे करण्यात यावा. त्यामध्ये १) शाळेचा क्रमांक २) शाळेचे नाव ३) शाळांची एकुण आवेदन पत्रे असा तक्ता करून आणावा. व त्याप्रमाणे अर्ज स्विकारले जातील. याप्रमाणे तक्ता न आणल्यास आवेदन पत्रे स्विकारली जाणार नाहीत.

शिक्षण संचालक,
माध्यमिक व उच्च माध्यमिक